पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - २२

**सभावृत्तांत**

दिनांक - **३०/०७/२०१५** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक **३०/०७/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) **मा. पालांडे सुजाता सुनिल – सभापती**
२) मा. वसंत (नाना) आनंदाराव लोंढे
३) मा. वाबळे संजय मल्हारराव
४) मा. सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५) मा. वाघेरे प्रभाकर नामदेव
६) मा. मासुळकर समीर मोरेश्वर
७) मा. विमलताई सुरेश जगताप

याशिवाय मा.गावडे – सह आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.डोईफोडे – सहा.आयुक्त, मा.बहाद्दरपुरे – सहा.समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) प्रभाग क्र.६ मोशी येथील विविध कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत – मा.समीर मासुळकर, मा.वसंत लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत – मा.समीर मासुळकर, मा.संजय वाबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत – मा.समीर मासुळकर, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत – मा.समीर मासुळकर, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत – मा.संजय वाबळे, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) विकास कामांच्या निविदा प्रसिध्दीकामी सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत – मा.मंदाकिनी ठाकरे, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) प्रभाग क्र.५७ पिंपळे गुरव येथील विविध विकास कामांच्या अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत – मा.समीर मासुळकर, मा.संजय वाबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) कुष्ठपिडीत अपंग व्यक्तींना अर्थसहाय्य देणेबाबत – मा.प्रभाकर वाघेरे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) वॉर्ड क्र.१० मोशी ( पुणे नाशिक रस्ता ते मोशी आळंदी) आराखडयातील रस्ते तयार करणे – मा.मंदाकिनी ठाकरे, मा.वसंत लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०)स्केटींग ग्राऊंड आच्छादित करणेबाबत – मा.मंदाकिनी ठाकरे, मा.विमल जगताप यांचा प्रस्ताव.

विषय क्र.११) ठराव रद्द करणेबाबत – मा.प्रभाकर वाघेरे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.प्रभाकर वाघेरे                    अनुमोदक – मा.मंदाकिनी ठाकरे

मा.विधी समितीची दिनांक ३०/०७/२०१५ ची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक ३१/०७/२०१५ रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**मा.सभापती -** शुक्रवार दिनांक ३१/०७/२०१५ रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( **पालांडे सुजाता सुनिल** )
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - २२

**सभावृत्तांत**

( दिनांक ३०/०७/२०१५ ची तहकूब सभा )

दिनांक - **३१/०७/२०१५** वेळ – दुपारी **२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक ३०/०७/२०१५ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक **३१/०७/२०१५** रोजी दुपारी **२.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) **मा. पालांडे सुजाता सुनिल – सभापती**
२) मा. वसंत (नाना) आनंदाराव लोंढे
३) मा. सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४) मा. विमलताई सुरेश जगताप

याशिवाय मा.गावडे – सह आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

अ) दिनांक ०५/१२/२०१४ व १९/१२/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ८)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक १९/१२/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ९)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

क) दिनांक ०२/०१/२०१५, १६/०१/२०१५ व ०६/०२/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्र.१०**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ड) दिनांक १६/०१/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ११)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

इ) दिनांक ३१/०१/२०१५ रोजी झालेल्या विशेष सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १२)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

फ) दिनांक ०६/०२/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १३)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**ग)** दिनांक २०/०२/२०१५, ०३/०३/२०१५(स.१०.४५ व दु.२.०० वा), २०/०३/२०१५ व २६/०३/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १४)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ह) दिनांक २०/०३/२०१५ व २६/०३/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १५)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ई) दिनांक ०४/०४/२०१५ व १७/०४/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १६)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

छ) दिनांक ०२/०५/२०१५, ०५/०५/२०१५, १५/०५/२०१५ व ०५/०६/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १७)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ज) दिनांक ०५/०६/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १८)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

झ) दिनांक १९/०६/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १९)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ट) दिनांक १७/०७/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक २०)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : १०७ — विषय क्रमांक : १

दिनांक : ३१/०७/२०१५ — विभाग **–** प्रशासन

सुचक : मा.वसंत लोंढे — अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.समीर मासुळकर, मा.वसंत लोंढे यांचा प्रस्ताव -

१) प्र.क्र.६ मोशी येथील विनायकनगर, बो-हाडेवाडी, वाघेश्वर कॉलनी, बो-हाटेवस्ती येथील रस्ते खडीमुरुमाचे व डांबरीकरणे करणे. निविदा नोटीस क्र.४५/४/२०१४-१५ मुळ अंदाजपत्रकीय र.रु.२०,००,०००/- सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.४८,५०,०००/-, २) प्र.क्र.६ मोशी बो-हाडेवाडी येथील रस्ते डांबरीकरण करणे. निविदा नोटीस क्र.४५/४/२०१४-१५ मुळ अंदाजपत्रकीय र.रु.३०,००,०००/- सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.४९,००,०००/-, ३) प्र.क्र.६ मोशी येथील पुणे – नाशिक महामार्गालगतच्या अंतर्गत रस्ते खडीमुरुमाचे व डांबरीकरणे करणे. निविदा नोटीस क्र.४५/१५/२०१४-१५ मुळ अंदाजपत्रकीय र.रु.२०,००,०००/- सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.४९,५०,०००/- वरील कामांना सुधारीत प्रशासकीय मान्यता व त्यानुसार काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १०८ विषय क्रमांक : २

दिनांक : ३१/०७/२०१५

सुचक : मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक : मा.विमलताई जगताप

संदर्भ : मा.समीर मासुळकर, मा.संजय वाबळे यांचा प्रस्ताव -

दळवीनगर आकुर्डी रेल्वे ओव्हरब्रिज दुरुस्ती व इतर कामे करणे करिता येणा-या अंदाजपत्रकीय र.रु.३०,००,०००/- ( अक्षरी र.रु.तीस लाख फक्त ) प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १०९ विषय क्रमांक : ३

दिनांक : ३१/०७/२०१५

सुचक : मा.विमलताई जगताप अनुमोदक : मा.वसंत लोंढे

संदर्भ : मा.समीर मासुळकर, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्रमांक २१ उद्योगनगर झोपडपट्टी ते उद्योगनगर नाल्यापर्यंत रस्त्याच्याकडेने गटर बांधणे करिता येणा-या अंदाजपत्रकीय र.रु.३८,००,०००/- (अक्षरी र.रु.अडतीस लाख फक्त) प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ११० विषय क्रमांक : ४

दिनांक : ३१/०७/२०१५

सुचक : मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक : मा.वसंत लोंढे

संदर्भ : मा.समीर मासुळकर, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव -

प्रेमलोक पार्क ते चापेकर चौकापर्यंत दुभाजक करणे या कामाच्याकरिता येणा-या अंदाजपत्रकीय र.रु.३०,००,०००/- (अक्षरी र.रु.तीस लाख फक्त) प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १११ विषय क्रमांक : ५

दिनांक : ३१/०७/२०१५

सुचक : मा.वसंत लोंढे अनुमोदक : मा.विमलताई जगताप

संदर्भ : मा.संजय वाबळे, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव -

एस.के.एफ.कॉलनी शेजारी वॉकींग ट्रॅक करणे या कामाच्याकरिता येणा-या अंदाजपत्रकीय र.रु.३०,००,०००/- (अक्षरी र.रु.तीस लाख फक्त) प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ११२ विषय क्रमांक : ६

दिनांक : ३१/०७/२०१५

सुचक : मा.विमलताई जगताप अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.समीर मासुळकर, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव –

मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ६६३ दि.०६/०४/२०१५ अन्वये म.न.पा.चे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. निगडी गावठाण प्रभाग क्र.१३ मधील एकूण ०६ (सहा) विकास कामांना ठेवणेत आलेली अंदाजपत्रकीय रक्कम कमी पडत आहे. म्हणजेच त्या सहाही विकासकामांची सद्यस्थितीतील आवश्यकता आणि कामाचे जागेवरील परिमाण यांचा विचार करता सदर कामांसाठी वाढीव अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता घ्यावी लागणार आहे. ज्या योगे निविदा कार्यवाही करुन कामे करणे सुलभ होणार आहे. सबब प्रस्तावात नमुद परिशिष्टानुसार स्तंभ क्र. ५ मध्ये नमुद असलेल्या अंदाजपत्रकीय रकमेऐवजी स्तंभ क्र. ६ मध्ये नमुद केलेल्या रकमांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. (र.रु.१,९४,७२,५००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ११३ विषय क्रमांक : ७

दिनांक : ३१/०७/२०१५

सुचक : मा.वसंत लोंढे अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.समीर मासुळकर, मा.संजय वाबळे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.५७ पिंपळे गुरव येथील विविध मनपा शाळा, सांस्कृतिक केंद्रे, व्यायामशाळा, दवाखाना इमारतींची रंगरंगोटी, देखभाल व दुरूस्तीची कामे करणे व प्रभाग क्र.५७ पिंपळे गुरव येथील संडास व मुता-यांची देखभाल दुरुस्तीची व स्थापत्य विषयक कामे करणे या दोन कामांचा समावेश पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात इमारती किरकोळ दुरुस्ती व देखभाल या लेखाशिर्षका अंतर्गत अनुक्रमे पान क्र.६५७, अनु.क्र.१७ व १८ मध्ये करणेत आलेली आहे. सदर कामासाठी तरतूद र.रु.१५,००,०००/- नमुद करणेत आलेली आहे. तथापि वरील नमुद केलेल्या कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेचा उल्लेख महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात नसल्याने कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मंजूरी घेणे आवश्यक आहे. विषयांकित दोन्ही कामांच्या र.रु.२२,५०,०००/- च्या अंदाजपत्रकीय रक्कमेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ११४ विषय क्रमांक : ८

दिनांक : ३१/०७/२०१५

सुचक : मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक : मा.विमलताई जगताप

संदर्भ : मा.प्रभाकर वाघेरे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या अपंग कल्याणकारी योजनेअंतर्गत शहरातील कुष्ठपिडित अपंग व्यक्तींना दरमहा र.रु.१,०००/- या प्रमाणे अर्थसहाय्य देण्यात येते. या योजनेला मा.महापालिका सभा

ठराव क्र.९४४, दि.२३/०७/२०१० अन्वये मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

सध्याचे लाभाचे स्वरुप – दरमहा र.रु.१,०००/-, सुधारित लाभाचे स्वरुप – दरमहा र.रु.२,५००/- तसेच जे नवीन अर्जदार या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करतील त्यांचे पिंपरी चिंचवड शहरातील वास्तव्य किमान १५ वर्षे असावे. वरीलप्रमाणे दुरुस्ती करणेस मान्यतेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ११५ विषय क्रमांक : ९

दिनांक : ३१/०७/२०१५

सुचक : मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक : मा.वसंत लोंढे

संदर्भ : मा.मंदाकिनी ठाकरे व मा.वसंत लोंढे यांचा प्रस्ताव –

वॉर्ड क्र.१० मोशी (पुणे नाशिक रस्ता ते मोशी आळंदी) आराखडयातील रस्ते तयार करणेचे निविदा नोटीस क्र.१९/३/२०१२-१३ कामांतर्गत मोशी आळंदी रस्त्याचे गावठाणातील रस्ता विकास आराखडयानुसार विकसीत करण्यात येत आहे. विषयांकित ६०% काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित काम करणेकरिता जागा मनपाच्या ताब्यात नाही. सदर ठिकाणी जुन्या काळातील नागरीकांची घरे बाधित होत असलेने व भुसंपादन झालेले नसलेने सदर रस्ता करणेस स्थानिक जागा मालकाचा विरोध होत आहे. त्यामुळे सदरच्या कामातून प्र.क्र.६ मोशी येथील मनपाच्या ताब्यात आलेल्या विकास आराखडयातील व आदर्शनगर, बारणेवस्ती, शिवाजीवाडी व बो-हाडेवाडी येथील अस्तित्वातील रस्ते नागरीवस्ती झाल्यामुळे करणेची आवश्यकता आहे. तरी सदर कामातून निविदा नोटीस क्र.१९/०३/२०१२-१३ वॉर्डातील ताब्यात आलेला रस्ता करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ११६ विषय क्रमांक : १०

दिनांक : ३१/०७/२०१५

सुचक : मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक : मा.विमल जगताप

संदर्भ : मा.मंदाकिनी ठाकरे, मा.विमल जगताप यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्रमांक २८ मधील स्केटींग ग्राऊंड आच्छादित करणेकामी येणारे अंदाजपत्रकीय रक्कम २४ लाख आहे. परंतु सन २०१५-१६ मध्ये शुन्य तरतूद असल्याने त्या ऐवजी रुपये पन्नास लाख तरतूद करणेत यावी व सदरची तरतूद भूसंपादना मधून वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ११७ विषय क्रमांक : ११

दिनांक : ३१/०७/२०१५

सुचक : मा. वसंत लोंढे अनुमोदक : मा. मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.प्रभाकर वाघेरे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव –

मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक ८२ व ८६, दिनांक ०६/०२/२०१५ रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **पालांडे सुजाता सुनिल** )
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५८३/२०१५
दिनांक : ०१/०८/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.0.152\e\e drive\Nagersachiv1\Vidhi-14-15\proceeding 22_Vidhi.doc